# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 165/2024 दिनांक : 10.05.2024

# 1)घरफोडी :–

**नायगाव :–** दिनांक 08.05.2024 रोजी 22.00 वा. ते दिनांक 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे व साक्षीदार यांचे घरी मौजे आंचोली ता. नायगाव जि. नांदेड येथे,** कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी व साक्षीदार यांचे तिन्ही ठिकाणच्या घराचे घराचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील सोन्या–चांदीचे दागीने व नगदी रूपये असा एकुण 2,36,500/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शंकर रावसाहेब मोरे, वय 41 वर्षे, व्यवसाय शेती रा. आंचोली ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 102/2024 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पंडीत, मो. नं. 9923184058** हे करीत आहेत.

# 2)मो. सा. चोरी :–

**भोकर :–** दिनांक 09.05.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **मारोती मंदीर जवळ भोकर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच–07/व्ही–7523 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत सुरा राठोड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. धावरी तांडा ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 144/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री औटे, मो.क्रं. 9011378018** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 07.05.2024 रोजी 23.30 वा. ते दिनांक 08.05.2024 रोजी 09.30 वा. चे दरम्यान, **आर.एम.सी.कॅम्प मध्ये दर्यापुर पाटी जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादी काम करत असलेले कंम्पनीचे आर.एम.सी. कॅम्प मधील राज्य मार्ग क्रमांक 44 रस्त्याचे कामाचे जड लोखंडी सेट्रींग प्लेट एकुण 60 नग किंमती 1,00,000/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी हनमंत भोईवाड, वय 40 वर्षे, व्यवसाय मॅनेजर KTIL कंम्पनी रा. छत्रपती चौक, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 194/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1333 बोरकर, मो.क्रं. 9112389670** हे करीत आहेत.

# 4)विवाहीतेचा छळ :–

**मुक्रमाबाद :–** सन 2020 ते दिनांक 05.04.2024 रोजी 14.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी अंतापुर व माहेरी लखमापूर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस किराणा दुकान टाकण्यासाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीबाईस शिवीगाळ करून मारहाण करून शारिरीक माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 82/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2000 सुरनर, मो.क्रं. 7447271727** हे करीत आहेत.

# 5)फसवणुक :–

**भाग्यनगर :–** दिनांक 29.03.2024 रोजी 10.56 वा. चे सुमारास, **बेलानगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस त्यांचे मोबाईलवर व्हॉटसअप मॅसेजव्दारे तुमचे वय काय आहे तुम्हाला ऑनलाईन घरबसल्या काम देण्यात येईल त्या कामासाठी तुम्हाला एकही रूपये भरण्याची आवश्यकता नाही त्यामध्ये 20 टास्क पुर्ण करायचे आहेत म्हणुन वरील आरोपीने त्यांनी पाठवलेले लिंक व अकाउंट ओपन करायला लावुन त्यातील टास्क पुर्ण करून त्यास रेटींग देण्याकरीता कमीशन देतो असे म्हणुन फिर्यादी कडुन तुमचे टास्क कंपलेट झाले नाहीत किंवा ते चुकीचे झाले आहेत ते पुर्ण केल्यानंतरच कमीशनसह तुमचे सर्व पैसे तुम्हाला परत मिळतील असे म्हणुन फिर्यादी कडुन रक्कम पुन्हा पुन्हा पाठविण्यात सांगुन एकुण 2,04,999/–रूपयाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी आश्विनी संजय सुर्यवंशी, वय 30 वर्षे, रा. बेलानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 193/2024 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनी/श्री वाघ, मो.नं. 9324546300** हे करीत आहेत.

# 6)अपघात :–

**भोकर :–** दिनांक 05.05.2024 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मौजे खरबी शिवारातील आश्रम शाळेसमोरील रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रभावती राहुल कोरबनवाड, वय 40 वर्षे, रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड** या व त्यांचे पती त्यांचे मोटार सायकलवर गावाकडे हिमायतनगर कडुन भोकर मार्गे परत येत असताना यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील हुंडाई कार क्रमांक एमएच–26/बीएक्स–5200 ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मोटार सायकलला जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी राहुल गणपत कोरबनवाड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. बारड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 143/2024 कलम 279,337,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री औटे, मो.क्रं. 9011378018** हे करीत आहेत.

## 7)अंमली पदार्थ :–

**शिवाजीनगर** :–दिनांक 08.05.2024 रोजी 20.50 वा. चे सुमारास, **दातार चौक नई आबादी शिवाजीनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने निळया रंगाचे कॅरीबॅगमध्ये गांजा अंमली पदार्थ 550 किलो ग्रॅम किंमती 2750/रूपयाचा मुद्देमाल स्वतःचे फायदयासठी विक्री करण्याचे उद्देशाने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जालींदर तांदळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 160/2024 कलम 20 ब एनडीपीएस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री सुरनर, मो.क्रं. 9922028409** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 09.05.2024 रोजी 18.15 वा. चे सुमारास, **मोटार सायकल रिपेरिंग दुकान समोर सार्वजनिक रोडवर वाजेगाव, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी कत्ती किंमती 500/–रूपयाची हातात घेवून फिरत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/811 नरेंद्र गंगारेड्डी यालावार,** ने. **पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 365/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 मोरे, मो.क्रं. 8208262971** हे करीत आहेत.

**2)इतवारा** :–दिनांक 09.05.2024 रोजी 00.10 वा. चे सुमारास, **अब्दुल रहेमा मज्जीद जवळ व आरोपीचे रहाते घरी इस्लामपुरा, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी कट्टा अग्नीशस्त्र एक जिवंत काडतुस, तीन लोखंडी खंजर असा एकुण किंमती 25,800/–रूपयाचा माल विनापरवाना बेकायदेशीर रित्या अनाधिकृतपणे विक्रीसाठी व वापरासाठी बाहगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री संग्राम उध्दवराव जाधव, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 124/2024 कलम 3,7,4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री राजु चव्हाण, मो.क्रं. 9082426369** हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**हदगाव** :– दिनांक 09.05.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **वाळकी खु. ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आारोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 3010/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2135 सखाराम देखुती नवघरे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 126/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2817 मुंडीक, मो.नं. 7774032817** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :–

**उमरी** :– दिनांक 09.05.2024 रोजी 09.30 वा. चे सुमारास, **मौजे धानोरा बु. शिवारातील आरोपीचे टीन पत्राच्या शेडमध्ये ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी विदेशी दारू व इतर साहित्य असा एकुण किंमती 52,223/–रूपयाचे मालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2354 रमण फकीरा गेडाम, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 155/2024 कलम 68,65(ई),83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2164 भालेराव, मो.नं. 7030221125** हे करीत आहेत.

## 11)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**किनवट** :–दिनांक 09.05.2024 रोजी 08.30 वा. चे सुमारास, **लोणी ते राजगड तांडा रोड लगत रोहिदास गणपत राठोड यांच्या शेतात मौजे राजगड तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे पवन बळीराम राठोड, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राजगड तांडा ता. किनवट जि. नांदेड** हा रोहिदास गणपत राठोड यांचे शेतात धुऱ्यावरील मजुरीने झाडाचे फांद्या तोडत असताना झाडाचे फांदीवरील 11 केव्हीए लाईनचा तार लागलेला असल्याने सदर झाडात विद्युत प्रवाह उतरल्याने शॉक लागून मरण पावला. वगैरे **खबर प्रमोद बळीराम राठोड, वय 37 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राजगड तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **16**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार, मो.नं. 9850061133** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 166/2024 दिनांक : 10.05.2024**

पोलीस अधीक्षक कार्यालयात **"महात्मा बसवेश्वर"** यांची जयंती साजरी

10 मे, 2024 शुक्रवार रोजी **"महात्मा बसवेश्वर"** या महापुरूषांची जयंती पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड, यांचेसह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने उपस्थित राहुन **"महात्मा बसवेश्वर"** या महापुरूषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **पोहेकॉ/संजय सांगवीकर, विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

